## आजचे पंचांग

गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, सप्तमी रात्री ९-२० पर्यंत, दिवस नक्षत्र- मूळ सकाळी ८-४९ पर्यंत नंतर पूर्वाषाढा,
चंद्र रास- धनु, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन



# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## पार्किंगसाठी पैसे मोजा

**पुणे**: शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासह, मुख्य रस्त्यांवर चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या पार्किंगला आळा घालण्यासाठी महापालिकेकडून शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरांतील प्रमुख पाच रस्त्यांवर सशुल्क पार्किंग सुरू केले जाणार आहे. त्यासाठी मागविलेल्या फेरनिविदांना अखेर प्रतिसाद मिळला आहे. त्यानुसार पाचपैकी चार रस्त्यांवरील सशुल्क पार्किंगसाठी प्रत्येकी दोन अशा आठ निविदा प्राप्त झाल्याची माहिती प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे यांनी दिली.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ९ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १९४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### भूखंड वाटपात घोटाळ्याचा आरोप

**मुंबई** : मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी बुधवारी आरोप केला की, शहर महानगरपालिकेने वरळी भागातील एक मोक्याचा भूखंड एका 'आवडत्या बिल्डर'ला कवडीमोल भावाने पंचतारांकित हॉटेल उभारण्यासाठी देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे आणि त्याचा लिलाव थांबवण्याची मागणी केली. "वरळीतील मोक्याचा भूखंड पंचतारांकित हॉटेलसाठी देऊ नका आणि लिलाव प्रक्रिया तात्काळ थांबवा," अशी मागणीही केली आहे.

### टपाली मतदान प्रक्रिया आणखी मजबूत

**कोलकाता** : टपाल मतदान प्रक्रिया अधिक मजबूत करण्यासाठी निवडणूक आयोगाने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असून, त्यानुसार सुविधा केंद्रे आणि टपाल मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही पाळत, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांची तैनाती आणि कडक निरीक्षक देखरेख अनिवार्य करण्यात आली आहे. निवडणूक कर्तव्यावर असलेले मतदार आणि अत्यावश्यक सेवांमधील अनुपस्थित मतदारांना लागू होणाऱ्या नियमांचे "कठोर पालन" सुनिश्चित करणे, हा या उपाययोजनांचा उद्देश आहे, असे आयोगाने म्हटले आहे.

### एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**सुरत** : गुजरातच्या सुरतमधील पालसानाजवळ बुधवारी एका उभ्या असलेल्या ट्रकला व्हॅन धडकल्याने एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. हा अपघात रात्री १२.३० वाजता घडला, अशी माहिती बार्डोली विभागाचे उपअधीक्षक एच. एल. राठोड यांनी दिली.

## इराण-अमेरिका संघर्षाला तात्पुरता विराम; दोन आठवड्यांची शस्त्रसंधी जाहीर

# धास्तावलेल्या जगाचा जीव भांड्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावाला अखेर तात्पुरता विराम मिळाला असून, दोन्ही देशांनी दोन आठवड्यांची सशर्त शस्त्रसंधी जाहीर केली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे पश्चिम आशियात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र निर्णायक टप्प्यावर दोन्ही बाजूंनी माघार घेत संवादाचा मार्ग स्वीकारल्याचे दिसत आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर मोठ्या प्रमाणावर हल्ला करण्याचा इशारा दिल्यानंतर काही तासांतच ही शस्त्रसंधी जाहीर केली. भारतीय वेळेनुसार पहाटे इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ला करण्याची तयारी सुरू होती. मात्र त्याआधीच इराणचा प्रस्ताव स्वीकारत अमेरिकेने लष्करी कारवाया थांबवण्याचा निर्णय घेतला.

या करारानुसार, दोन्ही देश पुढील दोन आठवड्यांसाठी सर्व प्रकारच्या लष्करी हालचाली स्थगित करतील. या काळात दीर्घकालीन शांतता करारासाठी चर्चा होणार आहे. इराणने सादर केलेला १० मुद्द्यांचा प्रस्ताव चर्चेसाठी व्यवहार्य असल्याचे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. या शस्त्रसंधीतील महत्त्वाची अट म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे आणि सुरक्षितपणे खुली ठेवणे. जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या मार्गातून अखंड जलवाहतूक सुरू राहावी, यासाठी अमेरिकेने आग्रह धरला होता. इराणनेही या अटीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात आले आहे.

ट्रम्प यांनी आपल्या निवेदनात म्हटले की, "आम्ही आमची लष्करी उद्दिष्टे साध्य केली आहेत आणि आता दीर्घकालीन शांततेच्या दिशेने वाटचाल करत आहोत." त्यांनी पाकिस्तानच्या मध्यस्थीची दखल घेत शहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर यांच्या प्रयत्नांचा उल्लेख केला.

दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले की, "अमेरिकेने हल्ले थांबवले, तर इराणही युद्धविराम पाळेल." त्यांनी पाकिस्तानच्या प्रयत्नांचे स्वागत करत आभार मानले. या शस्त्रसंधीवर प्रतिक्रिया देताना इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी याला "इराणचा विजय" असे संबोधले. त्यांच्या मते, इराणने आपली भूमिका ठाम ठेवत अमेरिकेला चर्चेस भाग पाडले. अंतिम करारासाठी पुढील चर्चा इस्लामाबाद येथे होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

ही शस्त्रसंधी ही कायमस्वरूपी शांततेचा करार नसून तात्पुरता विराम आहे. दोन्ही देशांनी विजयाचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात हा तणाव कमी करण्याचा आणि पुढील वाटाघाटींसाठी वेळ मिळवण्याचा प्रयत्न आहे. येत्या दोन आठवड्यांत होणाऱ्या चर्चांवरच या संघर्षाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## थकीत एफआरपीप्रकरणी २९ साखर कारखान्यांना नोटिसा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्यातील २०२५-२६ हंगामातील उसाच्या रास्त व किफायतशीर किंमती (एफआरपी) थकबाकीप्रकरणी साखर आयुक्तालयाने कडक भूमिका घेतली असून, सुमारे १,०१२ कोटी रुपयांची थकबाकी असलेल्या २९ साखर कारखान्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या प्रकरणी साखर संकुल येथे सोमवार, १३ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजता सुनावणी होणार असल्याची माहिती साखर संचालक (अर्थ) यशवंत गिरी यांनी दिली.

३१ मार्च २०२६ अखेरच्या आकडेवारीनुसार, ज्या कारखान्यांनी शेतकऱ्यांना देय असलेल्या एफआरपीपैकी ८० टक्क्यांपेक्षा कमी रक्कम अदा केली आहे, अशा एकूण ५३ कारखान्यांची नोंद झाली होती. त्यापैकी २४ कारखान्यांच्या सुनावण्या यापूर्वी पूर्ण झाल्या असून उर्वरित २९ कारखान्यांना आता नोटिसा देण्यात आल्या आहेत. या कारखान्यांकडून शेतकऱ्यांना देय असलेली एकूण एफआरपी रक्कम ३,०७४ कोटी ३३ लाख रुपये इतकी होती. त्यापैकी २,०६१ कोटी ८९ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले असून अद्याप १,०१२ कोटी ४४ लाख रुपये थकीत आहेत. सुनावणीदरम्यान कारखान्यांची बाजू ऐकून घेतली जाईल तसेच नोटिसांनंतर काही रक्कम अदा करण्यात आली आहे का, याचाही आढावा घेतला जाणार आहे. ऊस नियंत्रण आदेशानुसार, कारखान्यांनी ऊस पुरवठ्यानंतर १४ दिवसांच्या आत एफआरपीची रक्कम शेतकऱ्यांना देणे बंधनकारक आहे. अन्यथा विलंबासाठी १५ टक्के दराने व्याज आकारले जाऊ शकते.

## केंद्राच्या धोरणांवर सपकाळ यांचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : केंद्र सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात अपयश आल्यामुळे देशातील शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत, असा आरोप महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. मुंबई युवक काँग्रेसतर्फे आयोजित 'न्याय सत्याग्रह' आंदोलनात ते बोलत होते.

सपकाळ यांनी सांगितले की, सत्तेवर येण्यापूर्वी शेतकऱ्यांना दिलेली हमी पूर्ण करण्यात आलेली नाही. शेतीमालाला किफायतशीर भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. भाजपच्या कारकिर्दीत शेतीचा उत्पादन खर्च दुप्पट-तिप्पट वाढल्याचा दावा करत त्यांनी केंद्राच्या धोरणांवर टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' ही घोषणा प्रत्यक्षात पोकळ ठरली असून, गेल्या काही वर्षांत देशात पद्धतशीर लूट सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच केंद्र सरकारने अमेरिकेसोबत दबावाखाली व्यापारी करार केल्याचा दावा करत, त्याचा थेट फटका भारतीय शेतकऱ्यांना बसल्याचे त्यांनी म्हटले. या सरकारने शेतकरी, कामगार, तरुण आणि मजूर यांची फसवणूक केल्याचे सांगत सपकाळ यांनी सुरक्षाविषयक मुद्द्यांवरही प्रश्न उपस्थित केले. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारतीय लष्कर चांगली कामगिरी करत असताना एका फोन कॉलनंतर माघार घेण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

## १४ एप्रिलपासून प्रवास महागणार

# ऐन उन्हाळी सुट्टीत एसटीची भाडेवाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम सुरू होताच राज्यातील प्रवाशांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) ने प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन भाडेवाढ लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गावी किंवा पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या खर्चात वाढ होणार आहे.

उन्हाळी सुट्टीच्या काळात विशेषतः ग्रामीण भागात जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. या पार्श्वभूमीवर हंगामी भाडेवाढ करण्याचा अधिकार एसटी महामंडळाला देण्यात आला असून, त्यानुसार यंदा १० टक्के भाडेवाढ लागू करण्यात आली आहे. ही वाढ १४ एप्रिलच्या मध्यरात्रीनंतर लागू होणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने सणासुदीच्या आणि गर्दीच्या काळात ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्यास मंजुरी दिली असली, तरी सध्या १० टक्क्यांपुरतीच वाढ करण्यात आली आहे.

यासोबतच प्रवाशांकडून प्रत्येक तिकिटावर २ रुपयांचा स्वच्छता अधिभार आकारला जाणार आहे. एसटी स्थानके, बसगाड्या आणि आगार स्वच्छ ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक आणि इतर सवलतधारक प्रवाशांनाही हा अधिभार लागू राहणार आहे. 'आवडेल तेथे प्रवास' योजनेअंतर्गत चार व सात दिवसांच्या पासवर ५ रुपयांचा अधिभार आकारला जाईल, मात्र आगाऊ आरक्षणातून घेतलेल्या पासधारकांना यामधून सूट देण्यात आली आहे. तसेच बस भाड्याने घेणाऱ्यांना प्रति बस ५० रुपये अतिरिक्त शुल्क द्यावे लागणार आहे.

भाडेवाढीनंतर काही प्रमुख मार्गांवरील तिकिटदरही वाढले आहेत. मुंबई-कोल्हापूर प्रवासासाठी ७५० ऐवजी ८२५ रुपये, मुंबई-लातूरसाठी ९०० ऐवजी १००० रुपये, मुंबई-रत्नागिरीसाठी ६०० ऐवजी ७०० रुपये, मुंबई-पुण्यासाठी २८२ ऐवजी ३१४ रुपये, मुंबई-नाशिकसाठी ३२३ ऐवजी ३५९ रुपये, मुंबई-अलिबागसाठी १८२ ऐवजी २०४ रुपये, तर मुंबई-चिपळूणसाठी ४५३ ऐवजी ५०२ रुपये मोजावे लागणार आहेत.

ही भाडेवाढ साधी बस, मिडी बस, जलद सेवा आणि रात्रसेवा गाड्यांसाठी लागू असेल. मात्र शिवनेरी, शिवशाही, जनशिवनेरी, हिरकणी, शयनयान आणि ई-बस सेवांना या वाढीतून वगळण्यात आले आहे. वाढती प्रवासी संख्या आणि सेवा व्यवस्थापनाचा ताण लक्षात घेऊन एसटीने हा निर्णय घेतला असला, तरी या भाडेवाढीमुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे.

## शेतरस्त्यांवरील अतिक्रमणाविरोधात सरकारचा कडक निर्णय

# ...तर संबंधितांचे आधार कार्ड होणार ब्लॉक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील शेतकऱ्यांच्या हक्काचे शेतरस्ते मोकळे करण्यासाठी राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. शेतरस्त्यांवरील अतिक्रमण रोखण्यासाठी नवीन नियमावली लागू करण्यात आली असून, आता रस्ता अडवणे केवळ गुन्हा राहणार नाही, तर संबंधित व्यक्तींना सरकारी योजनांपासूनही वंचित राहावे लागू शकते.

नव्या नियमांनुसार, शेतरस्ते अडवणे, कुंपण घालणे किंवा रस्ता शेतात समाविष्ट करणे यासारख्या प्रकारांवर कडक कारवाई केली जाणार आहे. अशा प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाईसोबतच फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रशासनाला कोणत्याही दबावाशिवाय अतिक्रमण हटवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सरकारने शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जर एखाद्या शेतकऱ्याने रस्त्यासाठी स्वखुशीने जमीन दिली, तर त्या व्यवहारावरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतरस्त्यांसाठी जमीन उपलब्ध होण्यास मदत होईल. ही नियमावली गाव नकाशावरील रस्ते, पारंपरिक वहिवाटीचे मार्ग, पांदण रस्ते तसेच शेतात जाण्यासाठी वापरले जाणारे सर्व मार्ग यांना लागू होणार आहे. ग्रामीण भागात अशा रस्त्यांवरून वाद निर्माण होत असल्याने या निर्णयामुळे अनेक वाद मिटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक गावांमध्ये शेताकडे जाणारे रस्ते कागदोपत्री अस्तित्वात असले तरी प्रत्यक्षात काही ठिकाणी अतिक्रमणामुळे ते बंद झाले आहेत. त्यामुळे इतर शेतकऱ्यांना शेतीपर्यंत पोहोचणे कठीण होत होते. नव्या नियमांमुळे ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' अंतर्गत अतिक्रमणमुक्त रस्त्यांचे खडीकरण करून ते वर्षभर वापरण्यायोग्य बनवले जाणार आहे. यामुळे शेतीमालाची वाहतूक सुलभ होणार असून, विशेषतः पावसाळ्यातील अडचणी कमी होणार आहेत. अतिक्रमणाच्या तक्रारीनंतर संबंधितांना तहसीलदारामार्फत ७ दिवसांची नोटीस दिली जाईल. या कालावधीत अतिक्रमण न काढल्यास प्रशासन पोलिस बंदोबस्तात रस्ता मोकळा करेल आणि त्याचा खर्चही संबंधित अतिक्रमणधारकाकडून वसूल केला जाईल.

## चांदी आणि सोन्याच्या दरात मोठी तेजी

**नवी दिल्ली** : अमेरिका आणि इराण दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधीवर सहमत झाल्यानंतरच्या सकारात्मक जागतिक संकेतांमुळे, राजधानीत बुधवारी चांदीच्या दरात ११,००० रुपयांची वाढ होऊन तो २.५१ लाख रुपये प्रति किलोग्राम झाला, तर सोन्याचा भाव १.५६ लाख रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला. ऑल इंडिया सराफा असोसिएशनच्या मते, मंगळवारच्या २,४०,००० रुपये प्रति किलोच्या बंद भावावरून, पांढऱ्या धातूचा भाव ११,००० रुपयांनी, म्हणजेच ५ टक्क्यांनी वाढून २,५१,००० रुपये प्रति किलो झाला. ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याच्या दरातही ३,२०० रुपयांची वाढ झाली.

# राज्यात पटपडताळणी मोहीम

## शिक्षकांवर दुहेरी जबाबदारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची अचूक नोंद आणि प्रत्यक्ष उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी शिक्षण विभागाने 'पटपडताळणी' मोहिमेला गती दिली असून, ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ या तीन टप्प्यांत ही प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बनावट विद्यार्थी आणि शाळांचा शोध घेण्याच्या उद्देशाने शिक्षण संचालनालयाने घेतलेल्या या निर्णयात इयत्ता दुसरी ते नववी आणि अकरावीच्या वर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

३१ मार्च २०२६ रोजी जारी आदेशानुसार, राज्यातील सर्व शाळांमध्ये निश्चित तारखांना विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र ही प्रक्रिया परीक्षा काळातच राबवली जाणार असल्याने शिक्षकांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. विशेषतः इयत्ता नववीच्या वार्षिक परीक्षेदरम्यान मराठी, इंग्रजी आणि विज्ञान विषयांच्या दिवशीच पटपडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

इयत्ता पहिली ते आठवीसाठीही ११, १५ आणि २२ एप्रिल या कालावधीत पडताळणी निश्चित करण्यात आली आहे. याच काळात संबंधित इयत्तांच्या परीक्षा सुरू असल्याने शिक्षकांवर दुहेरी जबाबदारी येणार आहे. तसेच इयत्ता नववीच्या पूर्व-प्रगत चाचणी (पॅट) दिवशीही ही प्रक्रिया पार पाडावी लागणार आहे.

या मोहिमेसाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल तयार करण्यात आले असून, मुख्याध्यापक, क्लस्टर प्रमुख, गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांना लॉगिनची सुविधा देण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवण्याची जबाबदारी शिक्षकांवरच राहणार आहे.

## मध्य पूर्वेतील युद्धाचा परिणाम

# भारताने व्हेनेझुएलाकडून तेल आयात वाढवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय तेल आणि वायू पुरवठ्यावर परिणाम झाला असून, त्याचा थेट परिणाम भारताच्या आयात धोरणावर दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर भारताने एप्रिल महिन्यात दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलाकडून अंदाजे १० ते १२ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाची आयात केल्याची माहिती समोर आली आहे. कमोडिटी मार्केट विश्लेषण संस्था केप्लरच्या आकडेवारीनुसार, गेल्या सहा वर्षांतील ही सर्वाधिक आयात ठरणार आहे.
विशेष म्हणजे, गेल्या वर्षी मे




महिन्यानंतर प्रथमच एप्रिलमध्ये व्हेनेझुएलाचे कच्चे तेल भारतीय बंदरांवर दाखल होत आहे. जरी ही आयात एकूण गरजेच्या तुलनेत मर्यादित असली, तरी ती देशासाठी महत्त्वाची ठरत आहे. यामुळे भारताला कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता असून, विविध स्रोतांमधून आयात करण्याच्या धोरणाला बळकटी मिळत आहे.
भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजांपैकी ८८ टक्क्यांहून अधिक गरज आयातीद्वारे पूर्ण करतो. दररोज ५ दशलक्ष बॅरलपेक्षा अधिक कच्च्या तेलावर प्रक्रिया केली जाते. यातील ४० टक्क्यांहून अधिक आयात पश्चिम आशियातून होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे होते. मात्र, अलीकडील तणावामुळे या मार्गावरील जहाजवाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, व्हेनेझुएलातून येणारा तेलसाठा हा युद्धपूर्व काळातच खरेदी करण्यात आला असण्याची शक्यता आहे. मात्र, अशा जागतिक संकटाच्या काळात विविध देशांकडून तेल आयात करण्याचे धोरण भारतासाठी फायदेशीर ठरत असल्याचे यातून स्पष्ट होते. सध्या भारत ४० हून अधिक देशांकडून कच्चे तेल आयात करत असून, त्यामुळे एका प्रदेशावर अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. भारतीय रिफायनरी कंपन्या आधीपासूनच त्यांच्या कच्च्या तेलाच्या स्रोतांमध्ये विविधता आणत आहेत. विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीभोवतीच्या अनिश्चिततेमुळे हा बदल अधिक वेगाने होत आहे. एप्रिलमधील आयात ही तात्पुरती उपाययोजना नसून दीर्घकालीन ऊर्जा धोरणाचा भाग आहे. व्हेनेझुएलाच्या जड कच्च्या तेलामुळे भारतातील रिफायनिंग क्षमतेलाही बळकटी मिळत आहे. २०१९ मध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज ही या तेलाची प्रमुख खरेदीदार होती. मात्र, अमेरिकेच्या निर्बंधांमुळे ही आयात थांबवावी लागली होती. ऑक्टोबर २०२३ मध्ये निर्बंध शिथिल झाल्यानंतर पुन्हा आयात सुरू करण्यात आली.
सध्या रिलायन्स इंडस्ट्रीज, नायरा एनर्जी तसेच काही सरकारी रिफायनरी कंपन्या व्हेनेझुएलाच्या कच्च्या तेलावर प्रक्रिया करत आहेत. एचपीसीएल-मित्तल एनर्जी आणि इंडियन ऑइल याही मर्यादित प्रमाणात या तेलाचा वापर करत आहेत. व्हेनेझुएलाचे जड कच्चे तेल डिझेल आणि जेट इंधन निर्मितीसाठी उपयुक्त ठरत असल्याने भारताच्या ऊर्जा सुरक्षेला त्याचा हातभार लागत आहे.

## श्री क्षेत्र भीमाशंकर पुन्हा बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेले भीमाशंकर मंदिर भाविकांसाठी तात्पुरते बंद ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ एप्रिल ते ३१ मे २०२६ या कालावधीत मंदिर दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. मंदिर परिसरात सुरू असलेली विकासकामे आणि भाविकांच्या सुरक्षेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

मंदिरात सध्या नवीन सभामंडप उभारणीचे काम सुरू असून, पायरी मार्गासह विविध पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. या कामांसाठी मोठ्या प्रमाणात यंत्रसामग्री मंदिर परिसरात असल्याने भाविकांची ये-जा धोकादायक ठरू शकते. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वीही मंदिर काही काळासाठी बंद ठेवण्यात आले होते. आता पुन्हा सुमारे पावणे दोन महिने मंदिर बंद राहणार असून, पावसाळ्यापूर्वी ते पुन्हा खुले करण्याचा प्रयत्न असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवरही भीमाशंकर येथे नियोजन सुरू आहे. कुंभमेळ्याच्या काळात मोठ्या प्रमाणात भाविक येथे येत असल्याने भविष्यातील गर्दीचे व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या दृष्टीनेही सध्या कामे गतीने सुरू आहेत. भाविकांनी दर्शनासाठी जाण्यापूर्वी अधिकृत माहिती तपासूनच नियोजन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# प्रतिशोधाचा शेवट, न्यायाची सुरुवात?



**गुन्ह्याला कठोर शिक्षा हवी, ही समाजाची सहज प्रतिक्रिया असते. पण शिक्षा ही सूडासाठी असावी की न्यायासाठी, हा मूलभूत प्रश्न आहे. मृत्युदंड ही व्यवस्था न्याय देण्याचा मार्ग आहे की प्रतिशोधाची तृप्ती, याचा विचार टाळून चालणार नाही.**

भयानक भयानक गुन्ह्यानंतर समाजाची पहिली प्रतिक्रिया ठरलेली असते, कठोर शिक्षा हवी. आणि 'कठोर' या शब्दाचा अर्थ बहुतेक वेळा मृत्युदंड असा घेतला जातो. जणू न्यायव्यवस्थेची पराकाष्ठाच ती. पण प्रश्न असा आहे की, मृत्युदंड म्हणजे न्यायाचा सर्वोच्च बिंदू की प्रतिशोधाचा शेवटचा टप्पा? प्रतिशोधाची भावना मानवी आहे. ती स्वाभाविक आहे. पण न्यायव्यवस्था स्वभावावर चालत नाही; ती तत्त्वांवर उभी असते. गुन्हेगाराने जीव घेतला म्हणून राज्यानेही जीव घ्यावा, हा विचार आकर्षक वाटू शकतो. पण तो न्यायाचा पाया नाही. तो बदल्याची औपचारिक मांडणी आहे. मृत्युदंडाच्या समर्थनार्थ सर्वात मोठा दावा केला जातो, तो गुन्हे रोखतो. भीती निर्माण करतो. पण वास्तव इतके सोपे नाही. गुन्हेगारी ही केवळ शिक्षेच्या भीतीवर नियंत्रित होत नाही. सामाजिक, आर्थिक, मानसिक घटक त्यामागे असतात. मृत्युदंड असलेल्या आणि नसलेल्या देशांतील गुन्हेगारीचा तुलनात्मक अभ्यास पाहिला, तर ठोस फरक दिसत नाही. म्हणजेच भीती हा न्यायाचा विश्वासार्ह आधार नाही. मग उरतो तो नैतिक प्रश्न. राज्याला जीव घेण्याचा अधिकार आहे का? हत्या चुकीची आहे, असे सांगणारे राज्यच जर शिक्षेच्या नावाखाली हत्या करत असेल, तर त्या तत्त्वातील विसंगती कशी स्वीकारायची? हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे; पण तो टाळून चालत नाही. भारतीय न्यायव्यवस्थेने 'दुर्मिळात दुर्मिळ' हा मार्ग स्वीकारला. मृत्युदंड अपवाद म्हणून ठेवला. हा प्रयत्न संतुलन साधण्याचा होता. पण हा अपवाद नेमका कधी लागू करायचा, हा प्रश्न कायमच वादग्रस्त राहिला. कोणता गुन्हा 'दुर्मिळ' आणि कोणता नाही, याचे स्पष्ट मापदंड नाहीत. परिणामी, न्यायात सुसंगती राहत नाही. यामुळे आणखी एक गंभीर मुद्दा पुढे येतो—अनिश्चितता. समान स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये वेगवेगळे निकाल दिले जातात. एका प्रकरणात मृत्युदंड, दुसऱ्यात जन्मठेप. न्याय केवळ कठोर असावा लागतो, असे नाही; तो सुसंगतही असावा लागतो. अन्यथा तो न्याय राहात नाही. मृत्युदंडाचा सर्वात मोठा दोष म्हणजे त्याची अपरिवर्तनीयता. एकदा शिक्षा झाली, की ती मागे घेता येत नाही. न्यायव्यवस्थेत चुका होऊ शकतात, हे आपण मान्य करतो. पण त्या चुका जर अंतिम ठरल्या, तर त्याची भरपाई अशक्य असते. निरपराध व्यक्तीला फाशी देण्याची शक्यता ही केवळ सैद्धांतिक भीती नाही; ती वास्तवातील धोका आहे. जगभरात मृत्युदंडाविषयीचा दृष्टिकोन बदलत आहे. अनेक देशांनी तो रद्द केला आहे किंवा वापर थांबवला आहे. कारण न्यायाची संकल्पना बदलत आहे. शिक्षा ही केवळ दंड नाही; ती सुधारण्याची संधीही असावी, हा विचार बळकट होत आहे. गुन्हेगाराला शिक्षा देणे आवश्यक आहे; पण त्याच वेळी त्याच्या मानवी हक्कांचा विचार करणेही तितकेच आवश्यक आहे. भारतात मात्र समाजातील भावना वेगळ्या दिशेने जातात. भयानक गुन्ह्यांनंतर तात्काळ कठोर शिक्षेची मागणी होते. ही भावना समजण्यासारखी आहे. पण न्यायव्यवस्थेने या भावनांना पूर्णपणे शरण जाणे धोकादायक ठरते. कारण न्याय हा क्षणिक संतापावर उभा राहत नाही. राज्याची भूमिका इथे निर्णायक ठरते. राज्याने समाजाच्या भावनांचे प्रतिबिंब बनू नये; त्याने त्या भावनांना दिशा द्यावी. न्याय म्हणजे सूड नाही, हे ठामपणे सांगणे ही राज्याची जबाबदारी आहे. अन्यथा न्यायव्यवस्था ही भावनिक प्रतिक्रियांचे साधन बनते. याशिवाय, मृत्युदंडाच्या अंमलबजावणीत सामाजिक विषमता देखील दिसून येते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि कायदेशीर मदत अपुरी असलेल्या आरोपींना कठोर शिक्षेचा फटका अधिक बसतो, अशी निरीक्षणे अनेकदा नोंदली गेली आहेत. त्यामुळे न्याय केवळ तत्त्वांचा नसून, तो उपलब्ध साधनसंपत्तीवरही अवलंबून राहतो, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येत नाही. शेवटी, मृत्युदंडाचा प्रश्न हा केवळ कायद्याचा नाही; तो सभ्यतेचा आहे. आपण कोणत्या मूल्यांवर उभे आहोत, हा तो विचारतो. न्यायव्यवस्था समाजाचे आरसे असते; पण ती समाजाच्या क्षणिक भावनांचे प्रतिबिंब नसते. प्रतिशोध क्षणिक समाधान देतो. न्याय मात्र समाज टिकवतो. मृत्युदंड त्या समाधानाची हमी देतो; पण न्यायाची नाही. आणि म्हणूनच प्रश्न शिक्षेचा नाही तो न्यायाच्या अर्थाचा आहे.

# मसुद्यात अडकलेली पाकिस्तानची परराष्ट्रनीती

**» राजनैतिक संदेश हा शब्दांचा खेळ नसतो; तो राष्ट्राच्या भूमिकेचा आरसा असतो. पण जेव्हा तोच संदेश 'मसुदा' अवस्थेत उघड होतो, तेव्हा प्रश्न चुकांपुरता मर्यादित राहत नाही. पाकची परराष्ट्रनिती कोण लिहिते असा प्रश्न आहे.**



परराष्ट्रनीती ही घाईत घडत नाही. ती विचारपूर्वक आकार घेत असते. प्रत्येक शब्द मोजून वापरला जातो, प्रत्येक वाक्याचा अर्थ तपासला जातो आणि प्रत्येक संकेताचा परिणाम लक्षात घेतला जातो. कारण एकदा तो संदेश बाहेर गेला, की तो केवळ मत राहत नाही; तो राष्ट्राची भूमिका बनतो. अशा वेळी 'मसुदा' अवस्थेतील संदेश सार्वजनिक होणे ही केवळ तांत्रिक चूक मानता येत नाही.

पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरिफ यांच्या एका ट्वीटमुळे हा मुद्दा समोर आला. इराणसंदर्भातील भूमिकेवर भाष्य करताना त्यात 'ड्राफ्ट' स्वरूपातील मजकूर दिसून आला. काही क्षणांत तो दुरुस्त झाला, स्पष्टीकरणेही आली; पण त्या काही क्षणांनीच पडद्यामागील प्रक्रियेची झलक दिली. आणि ही झलकच अधिक बोलकी ठरते.

ही घटना एका चुकलेल्या ट्वीटची गोष्ट नाही. ती निर्णयप्रक्रियेच्या स्वरूपावर बोट ठेवते. परराष्ट्रनीती तयार होण्याची यंत्रणा किती सुसंगत आहे, अंतिम शब्द कोणाचा असतो आणि त्या शब्दामागील विचार किती ठाम असतो असे सारे प्रश्न एकदम समोर येतात. कारण 'मसुदा' हा केवळ अपूर्ण मजकूर नसतो; तो अपूर्णतेचा संकेत असतो.

पाकिस्तानच्या संदर्भात हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आहे. त्या देशात परराष्ट्रनीती ही केवळ नागरी सत्ताकेंद्राच्या अखत्यारीत राहिलेली नाही, हे सर्वश्रुत आहे. लष्करी प्रतिष्ठान, गुप्तचर संस्था आणि आंतरराष्ट्रीय भागीदार यांचा त्यावर प्रभाव राहिल्याचे इतिहास वारंवार दाखवतो. त्यामुळे एखादा संदेश 'मसुदा' अवस्थेत दिसणे म्हणजे केवळ भाषिक त्रुटी नसून, निर्णयप्रक्रियेतील अनेक केंद्रे अस्तित्वात असल्याचा संकेत मानावा लागतो.

इराणसारख्या विषयावर भूमिका मांडताना ही गुंतागुंत अधिकच वाढते. एका बाजूला पश्चिमी देशांशी संबंध, दुसऱ्या बाजूला इस्लामी जगतातील स्थान आणि तिसऱ्या बाजूला प्रादेशिक समीकरणे या सर्वांचा समतोल साधावा लागतो. अशा वेळी शब्दांची निवड ही केवळ भाषेची नसते; ती धोरणाची असते. तोल सांभाळण्याचा प्रयत्न दिसणे अपेक्षित असते. पण तोच तोल 'मसुद्या'त अडकलेला दिसला, तर संतुलनाच्या दाव्यालाच प्रश्न निर्माण होतो.

यातून पुढे येणारा मोठा मुद्दा म्हणजे स्वायत्ततेचा. परराष्ट्रनीती ही राष्ट्राच्या सार्वभौमतेची अभिव्यक्ती असते. ती बाह्य दबावांना प्रतिसाद देऊ शकते; पण त्यांच्याद्वारे आकारली जाऊ नये, ही अपेक्षा असते. मात्र जेव्हा संदेशच अपूर्ण अवस्थेत बाहेर पडतो, तेव्हा तो कोणाच्या मार्गदर्शनाखाली घडत आहे, हा प्रश्न अनिवार्य ठरतो. आजच्या डिजिटल युगात या प्रश्नाला वेगळी धार प्राप्त झाली आहे. सोशल मीडिया हे केवळ संवादाचे माध्यम राहिलेले नाही; ते धोरणात्मक संकेत देण्याचे व्यासपीठ बनले आहे. त्यामुळे ट्वीट ही वैयक्तिक अभिव्यक्ती राहात नाही. ती अधिकृत भूमिकेची पहिली झलक असते. आणि म्हणूनच त्यातील चूक ही साधी राहत नाही.

याच ठिकाणी राजकीय नेतृत्वाची कसोटी लागते. संदेश देण्यापूर्वीची तयारी, सुसंगती आणि स्पष्टता या गोष्टी अनिवार्य ठरतात. अन्यथा संदेशातली ढवळाढवळ ही धोरणातील ढवळाढवळ म्हणूनच पाहिली जाते. शब्दांची अनिश्चितता ही भूमिकेतील अनिश्चिततेचे लक्षण मानली जाते. ही बाब केवळ पाकिस्तानपुरती मर्यादित नाही. ती व्यापक संकेत देते. आज अनेक देशांमध्ये परराष्ट्रनीती ही अधिकाधिक सार्वजनिक होत चालली आहे. निर्णय घेतले जातात तेव्हा ते त्वरित लोकांसमोर येतात. या पारदर्शकतेमुळे उत्तरदायित्व वाढते; पण त्याचबरोबर चुका लपवणे अशक्य होते. आणि अशा चुका केवळ तांत्रिक राहत नाहीत त्या व्यवस्थेच्या स्वरूपावर प्रश्न उपस्थित करतात. परराष्ट्रनीती ही विश्वासावर उभी असते. देशांतर्गत विश्वास आणि आंतरराष्ट्रीय विश्वास आवश्यक असतात. जर संदेशच सुसंगत नसेल, तर विश्वास डळमळीत होतो. आणि विश्वास डळमळीत झाला, की सामर्थ्यही कमी होते. 'मसुदा' हा शब्द साधा आहे; पण त्याचा अर्थ गंभीर आहे. तो अपूर्ण वाक्य दाखवतो, पण त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे तो अपूर्णतेची जाणीव करून देतो. प्रश्न एका ट्वीटचा नाही. प्रश्न त्या ट्वीटमागील रचनेचा आहे. आणि परराष्ट्रनीतीच जर मसुद्यात अडकली, तर अंतिम निर्णय नेमका कुणाचा, हा प्रश्न टाळता येत नाही.

# वाकडमध्ये अतिक्रमणांवर पालिकेचा हातोडा

## महापालिकेकडून अतिक्रमण निर्मूलन मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** वाकड–म्हातोबानगर परिसरात पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबवण्यात आली असून विकास आराखड्यातील २४ मीटर डीपी रस्त्यावर अडथळा ठरणाऱ्या ४१ अनधिकृत झोपड्या व बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. सुमारे १५०० चौरस मीटर जागा अतिक्रमणमुक्त करण्यात आली असून रस्ता रुंदीकरणासाठी हा मार्ग मोकळा झाला आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई करण्यात आली. क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, कार्यकारी अभियंता आर. व्ही. शिंदे तसेच दळणवळण विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रकांत मोरे यांच्या पथकाने संयुक्तपणे मोहिम राबवली.

या कारवाईत महापालिकेचे स्थापत्य, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन, शहरी दळणवळण, नगररचना, विद्युत, अतिक्रमण विभाग तसेच अग्निशामक दल आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांचा सहभाग होता. मोठा पोलीस बंदोबस्त ठेवून ही मोहीम पार पडली.

महापालिकेच्या विकास आराखड्यात रस्ते व विविध सार्वजनिक सुविधांसाठी जागा आरक्षित करण्यात आलेली असून त्या जागा अतिक्रमणमुक्त ठेवणे आवश्यक आहे. अशा अतिक्रमणांमुळे विकासकामांना अडथळे निर्माण होतात, त्यामुळे नियमानुसार निष्कासनाची कारवाई केली जात असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीचा ताण लक्षात घेता रस्ते रुंदीकरण अत्यावश्यक असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नमूद केले. अतिक्रमण हटविण्याच्या कारवायांना नागरिकांनी सहकार्य केल्यास शहराचा नियोजनबद्ध व सुसज्ज विकास साधता येईल, असे आवाहन त्यांनी केले.

# रिक्त पदे तातडीने भरण्याचे महापौरांचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने रिक्त पदांचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महापौर रवि लांडगे यांनी ही पदे तातडीने भरण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि विस्तार लक्षात घेता प्रशासनिक यंत्रणा सक्षम असणे अत्यावश्यक असल्याचे महापौरांनी नमूद केले. सध्या अनेक विभागांमध्ये मनुष्यबळ अपुरे असल्यामुळे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे सर्व विभागांनी विद्यमान तसेच आगामी काळात रिक्त होणाऱ्या पदांची माहिती तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आवश्यक पदांसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करून भरती प्रक्रिया गतीमान करण्यावरही भर देण्यात आला आहे. महापौर कार्यालयामार्फत या प्रक्रियेचा नियमित पाठपुरावा केला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, शहराचा वेगाने होत असलेला विकास लक्षात घेता सक्षम प्रशासन ही काळाची गरज आहे. रिक्त पदांमुळे नागरिक सेवेत अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी आवश्यक त्या सर्व पदांची भरती तातडीने करण्यात यावी.

# मावळ बाजार समितीत राष्ट्रवादीला धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीत राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला असून पक्षातील अंतर्गत फुटीमुळे अखेर सर्व १३ संचालकांनी राजीनामे दिले आहेत. सोमवारी ९ संचालकांनी राजीनामे दिल्यानंतर मंगळवारी उर्वरित चार जणांनीही पदाचा राजीनामा दिला, त्यामुळे बाजार समिती बरखास्त होण्याच्या मार्गावर असल्याची चर्चा रंगली आहे.

अलीकडेच झालेल्या सभापती पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादीकडे बहुमत असतानाही पक्षातील सहा मते फुटल्याने भाजपचे उमेदवार सुभाषराव जाधव विजयी झाले होते. या निकालानंतर पक्षांतर्गत नाराजी उघड झाली आणि नेतृत्वाने कठोर भूमिका घेतली. आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या संचालकांची तातडीची बैठक घेण्यात आली होती. बैठकीत सर्वांनी राजीनामे द्यावेत, असे निर्देश देण्यात आले.. त्यानुसार दिलीप ढोरे, विक्रम कलावडे, भरत टकले, अमोल मोकाशी, मारुती वाळुंज, नथुराम वाघमारे, सुप्रिया मालपोटे, अंजली जांभुळकर आणि काँग्रेसचे विलास मालपोटे यांनी सोमवारी राजीनामे सुपूर्द केले. त्यानंतर माजी सभापती संभाजी शिंदे, माजी उपसभापती नामदेव शेलार, उपसभापती विकास मानकर आणि संचालक शंकर वाजे यांनीही मंगळवारी राजीनामे दिले.

# 'स्मार्ट सिटी'च्या धर्तीवर लोणावळ्याचा विकास

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणावळा** : पर्यटनाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या लोणावळा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात असून 'स्मार्ट सिटी'च्या धर्तीवर शहराचा विकास करण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत या विकास आराखड्याला गती देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख शहरांच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या लोणावळ्याचे निसर्गसौंदर्य देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करत असल्याने, शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला. आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकारातून झालेल्या या बैठकीत शहरातील प्रलंबित प्रश्न सोडवण्याबरोबरच आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला. या आराखड्यानुसार शहरातील प्रमुख रस्त्यांचे सुशोभीकरण, पदपथांची सुधारणा आणि महत्त्वाच्या चौकांमध्ये आधुनिक बदल करण्यात येणार आहेत. तसेच अतिक्रमणांवर नियंत्रण ठेवून हॉकर्स झोन आणि नियोजित पार्किंग व्यवस्था उभारण्यावरही भर दिला जाणार आहे. शहरात भूमिगत विद्युतवाहिन्या, नवीन पथदिवे आणि पिण्याच्या पाण्याचे सक्षम नियोजन करण्यात येणार असून, कचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

आमदार सुनील शेळके यांनी शहरात नवीन प्रकल्प आणून स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावरही लक्ष केंद्रित केले आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयामुळे लोणावळ्याचा विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या बैठकीला लोणावळा नगर परिषदेचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक उपस्थित होते. पक्षभेद विसरून सर्वांनी या विकास आराखड्याला सकारात्मक प्रतिसाद दिला.

या उपक्रमामुळे लोणावळा शहर अधिक सुबक, सुरक्षित आणि पर्यटकांसाठी आकर्षक ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## महापौर रवि लांडगे यांचे प्रतिपादन; नामकरण सोहळा उत्साहात

# 'सरकार शितोळे सेतू'मुळे शहराच्या सौंदर्यात भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** मुळा नदीवरील सांगवी–बोपोडी दरम्यान असलेल्या पुलाचे 'सरकार शितोळे सेतू' असे नामकरण करण्यात आले असून, पुलावरील विद्युत रोषणाई व सुशोभीकरणामुळे परिसराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना अधिक सुरक्षित व सुसज्ज प्रवासाचा अनुभव मिळणार असून, शहराच्या विकासाला नवा आयाम मिळेल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात महापौरांच्या हस्ते पुलाच्या सुशोभीकरण कामाचे लोकार्पण व नामकरण सोहळा पार पडला. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, तसेच नगरसदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरकार शितोळे यांच्या कुटुंबीयांचीदेखील उपस्थिती होती. महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, शहरातील विद्यमान पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावून त्यांना आधुनिक रूप देण्यावर महापालिका भर देत आहे. या पुलाच्या सुशोभीकरणामुळे केवळ वाहतुकीची सोय सुधारली नसून शहराच्या सौंदर्यवृद्धीलाही चालना मिळाली आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडविणाऱ्या अशा प्रकल्पांना भविष्यातही प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही यावेळी बोलताना शहरातील पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि देखभाल यावर विशेष भर दिला जात असल्याचे सांगितले. पुलावरील रोषणाईमुळे सुरक्षितता वाढून प्रवास अधिक सुखद होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी प्रास्ताविक करताना या पुलाच्या विकासकामांची माहिती दिली. सांगवी–बोपोडी परिसरातील हा महत्त्वाचा दुवा आता 'सरकार शितोळे सेतू' या नावाने ओळखला जाईल आणि त्यामुळे परिसराच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# पासपोर्ट पडताळणीत ५२० अर्ज बाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** परदेशात जाण्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या तब्बल ५२० जणांचे पासपोर्ट अर्ज पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या पडताळणी प्रक्रियेत बाद करण्यात आले आहेत. त्यामुळे परदेशवारीचे स्वप्न पाहणाऱ्या अनेकांना मोठा धक्का बसला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाकडे २०२५ या वर्षात एकूण १,०१,५५६ पासपोर्ट अर्ज पडताळणीसाठी प्राप्त झाले होते. त्यापैकी १,०१,०३६ अर्ज मंजूर करण्यात आले, तर पोलिस तपासात गुन्हे उघडकीस आल्याने ५२० अर्ज थेट नाकारण्यात आले. वाढत्या अर्जांच्या पार्श्वभूमीवर पोलिस पडताळणी प्रक्रिया अधिक महत्त्वाची ठरत असल्याचे दिसून येत आहे. पासपोर्ट प्रक्रियेत पोलिस पडताळणी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. अर्जदाराची ओळख, पत्ता, कागदपत्रांची सत्यता तपासण्याबरोबरच त्याच्यावर कोणतेही गुन्हे दाखल आहेत का, न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे का, याची सखोल चौकशी केली जाते. आयुक्तालयांतर्गत प्रत्येक पोलिस ठाण्यात स्वतंत्र पडताळणी विभाग कार्यरत असून, स्थानिक स्तरावर माहिती गोळा करून ती आयुक्तालयाकडे पाठवली जाते. येथे दुसऱ्या टप्प्यात छाननी केली जाते. या दुहेरी पडताळणीमुळे त्रुटी राहण्याची शक्यता कमी होते.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### तरुणीच्या मृत्यू प्रकरणी गुन्हा दाखल

**चाकण** : २९ वर्षीय तरुणीच्या मृत्यू प्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना देशमुख आळी चाकण येथे घडली आहे. याप्रकरणी करण टोंगारिया (रा. करोल बाग, नवी दिल्ली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ वर्षीय तरुणी मूळची नागपूर येथील असून ती सध्या देशमुख आळी चाकण भागात राहायला होती. २ दिवसांपूर्वी या तरुणीने राहत्या घरात गळफासाने आत्महत्या केली. तिचा मृतदेह देशमुख आळी येथील घरात मिळून आला होता. संबंधित तरुणीसोबत करण टोंगारीया याने प्रेम संबंध ठेवून नंतर लग्नास नकार दिला. या घटनेत संबंधित तरुणीच्या मृत्यूप्रकरणी करण याच्यावर चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित मृत तरुणीच्या भावाने पोलिसांत तक्रार दिली आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

### वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**चाकण** : चाकण शिक्रापूर रस्त्यावर भोसे ता. खेड येथील इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या जवळ पठारे वस्ती भागात रस्ता ओलांडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकास भरधाव अज्ञात चार चाकी वाहनाने चिरडल्याची घटना घडली आहे. या अपघातातील मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नाही. याप्रकरणी संतोष लोणारी (वय ३३, रा. भोसे) यांनी उत्तर चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे . त्यानुसार चाकण शिक्रापूर रस्त्यावर भोसे येथील इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या जवळील भागात रस्ता ओलांडत असलेल्या अंदाजे ५५ ते ६० वर्षे वयाच्या इसमास भरधाव चार चाकी वाहनाने जोरदार धडक दिली. यामध्ये संबंधित व्यक्तीला गंभीर जखमी झालेल्या पादचारी इसमाचा जागीच मृत्यू झाला. संबंधित अज्ञात चार चाकी वाहन चालकाने अपघातानंतर वाहनासह तसाच पुढे पोबारा केला. चाकण उत्तर पोलीस याबाबतचा अधिक तपास करत आहेत.

---

### वाहतूक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह; पोलिसांच्या कार्यक्षमता वादात

# पुणे–सोलापूर महामार्गावर भीषण कोंडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : पुणे–सोलापूर महामार्गावरील वाढती वाहतूककोंडी आता गंभीर स्वरूप धारण करत असून, लोणी काळभोर वाहतूक पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. 'स्मार्ट सिटी'च्या दाव्यांच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षात नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्याने संताप वाढू लागला आहे.

बुधवारी पहाटे एका कंटेनरच्या बिघाडामुळे परिस्थिती आणखी चिघळली. कवडी पाट टोल नाका ते थेऊरदरम्यान सुमारे पाच ते सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. एका बाजूची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. नेहमीचा दहा मिनिटांचा प्रवास तब्बल ४५ मिनिटांपेक्षा अधिक वेळ घेत असल्याने वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

दररोज सकाळी आणि सायंकाळी या मार्गावर वाहनांची प्रचंड गर्दी होत असून, शालेय विद्यार्थी, नोकरदार तसेच रुग्णवाहिका यांनाही या कोंडीत अडकून विलंबाचा सामना करावा लागत आहे. मात्र, या परिस्थितीत वाहतूक पोलिसांची उपस्थिती अपुरी असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे.

महामार्गावर अनियोजित पार्किंग, रस्त्यावर उभे असलेली अवजड वाहने, फेरीवाल्यांची वाढती संख्या आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे कोंडीची समस्या अधिकच गंभीर बनली आहे. तरीही यावर प्रभावी कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी पोलिसांचा पूर्ण अभाव जाणवतो, तर काही ठिकाणी केवळ औपचारिक उपस्थिती दिसते.

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सिग्नल व्यवस्थापन, पर्यायी मार्गांची आखणी आणि अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याबाबत कोणतीही ठोस योजना दिसत नसल्याने नागरिकांचा रोष वाढत आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिकांनाही मार्ग काढणे कठीण होत असल्याने जीवितास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर "वाहतूक पोलिस नेमके काय करत आहेत?" असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत असून, तातडीने प्रभावी उपाययोजना राबवण्याची मागणी होत आहे. अन्यथा, भविष्यात ही समस्या आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या महामार्गावरील कोंडी केव्हा फुटणार हाच प्रश्न कायम आहे.

---

## बारामतीत पोटनिवडणुकीला रंग ५५ उमेदवारांमुळे लढत चुरशीची

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती** : बिनविरोध होईल असा सुरुवातीचा अंदाज फोल ठरवत बारामती विधानसभा पोटनिवडणूक आता चुरशीच्या टप्प्यात पोहोचली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांना सहानुभूतीची लाट मिळेल आणि निवडणूक सोपी जाईल, अशी महायुतीची अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात ५५ उमेदवार रिंगणात उतरल्याने चित्र पूर्णपणे बदलले आहे.

काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी देत धनगर समाजाचा मुद्दा पुढे आणला आहे. त्यामुळे निवडणुकीत सामाजिक समीकरणांना नव्याने धार मिळाली असून सुनेत्रा पवार यांच्यासाठी ही लढत अधिक कठीण बनली आहे. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत भाजपकडून पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन देण्यात आले. बारामतीत भाजप 'मोठा भाऊ' म्हणून पाठीशी उभा राहील, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सुनेत्रा पवार यांनी ६ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांनी राज्यसभेचा राजीनामा देत राज्याच्या राजकारणात सक्रिय भूमिका घेतली आणि बारामतीतून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीत करुणा मुंडे आणि अभिजित बिचुकले यांच्यासह विविध उमेदवार रिंगणात असल्याने रंगत वाढली आहे. दरम्यान, काँग्रेसने उमेदवार दिल्याने पार्थ पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, "ही काँग्रेसच्या अधोगतीची सुरुवात आहे," असे वक्तव्य त्यांनी केले आहे. २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे. वाढती स्पर्धा, बदलती समीकरणे आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींमुळे ही निवडणूक राज्याच्या राजकारणात विशेष लक्षवेधी ठरत आहे.

---

## जारकरवाडीतील धोकादायक विहीर



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : लोणी ते मंचर (ता. आंबेगाव) मार्गावरील जारकरवाडी येथील भोजणधरा परिसरात रस्त्याच्या अगदी कडेला असलेली विहीर अपघाताचे कारण ठरण्याची भीती व्यक्त होत आहे. विहिरीभोवती मोठ्या प्रमाणात झुडपे वाढलेली असून त्याच ठिकाणी रस्त्यावर वळण असल्याने समोरून येणारी वाहने दिसत नाहीत. त्यामुळे येथे अपघाताची शक्यता वाढली आहे.

हा मार्ग जवळचा असल्याने लोणी, जारकरवाडीमार्गे मंचरकडे जाणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ असते. तसेच शिरूर तालुक्यातील शिक्रापूर, केंदूर, पाबळ, कान्हूर मेसाई, जातेगाव, मुखई, करंदी आदी गावांतील नागरिक अवसरी खुर्द, मंचर, घोडेगाव, नारायणगाव येथे ये-जा करण्यासाठी याच रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात असतो.

रस्त्यालगत असलेली विहीर आणि झुडपांमुळे कमी झालेली दृश्यमानता यामुळे वाहनचालकांना धोका निर्माण झाला आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने येथे संरक्षक कठडे उभारावेत, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

या संदर्भात उपसरपंच सचिन टाव्हरे यांनी सांगितले की, ग्रामपंचायत किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून येथे संरक्षक कठडा उभारण्याचा प्रयत्न केला जाईल.

---

## चाकणमध्ये कर वसुली मोहिमेला मोठा प्रतिसाद

### ११००हून अधिक मिळकतधारकांनी घेतला 'अभय योजने'चा लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चाकण** : चाकण नगरपरिषदेच्या वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राबविण्यात आलेल्या विशेष कर वसुली मोहिमेला तसेच महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने जाहीर केलेल्या 'अभय योजने'ला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. नागरिकांनी थकीत आणि चालू मालमत्ता कर भरण्यास प्राधान्य दिल्यामुळे ३१ मार्च २०२६ अखेर शहरात तब्बल ९ कोटी ८३ लाख रुपयांची विक्रमी वसुली झाली आहे.

चालू आर्थिक वर्षासाठी नगरपरिषदेकडून १५ कोटी २० लाख रुपयांची कर मागणी निश्चित करण्यात आली होती. यात १० कोटी ६६ लाख रुपयांची थकीत मागणी व शास्ती, तर ४ कोटी ५४ लाख रुपयांची चालू मागणी होती. नियोजनबद्ध मोहीम, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे वसुलीचे प्रमाण समाधानकारक राहिले आहे.

एकूण वसुली ६४.६६ टक्के झाली असून, त्यात चालू मागणीची वसुली ८३.१३ टक्के, तर थकीत मागणीची वसुली ५७ टक्के इतकी नोंदवली गेली आहे.

थकीत कर भरणाऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या 'अभय योजने'लाही चांगला प्रतिसाद मिळाला. चाकणमधील १,११२ मिळकतधारकांनी या योजनेचा लाभ घेतला. याअंतर्गत सुमारे ४ कोटी ८३ लाख रुपयांच्या शास्तीपैकी अंदाजे १ कोटी ५० लाख रुपयांची शास्ती माफ करण्यात आली. त्यामुळे नागरिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, थकीत कराचा बोजा कमी करण्यास मदत झाली आहे.

या यशस्वी वसुली मोहिमेमुळे शहरातील विकासकामांना गती मिळण्यास मदत होणार आहे. ज्या नागरिकांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी त्वरित कर भरून शहराच्या विकासात सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे. या मोहिमेसाठी मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्ष मनीषा गोरे, कर अधिकारी सुनील गोरडे, सहाय्यक कर निरीक्षक नेहा कुलकर्णी यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

---

## वारकरी संप्रदायाकडून तीव्र प्रतिक्रिया

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : पुण्यात २२ मार्च रोजी झालेल्या जाहीर मेळाव्यात लेखिका मुग्धा कर्णिक यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, पंढरीची वारी आणि विठ्ठल उपासना याबाबत केलेल्या वक्तव्यावरून वारकरी संप्रदाय आणि विविध संघटनांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर पारगाव (ता. आंबेगाव) येथे संबंधितांवर कारवाईची मागणी करत पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे आणि ह.भ.प. निवृत्ती महाराज लोखंडे यांनी पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात लेखी निवेदन सादर केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी हे निवेदन स्वीकारले.

निवेदनात संत परंपरा, वारीची भक्तीसंस्कृती आणि वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा आधार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी रुजविलेला विचार हा समानता, मानवता आणि अहिंसेचा मार्ग दाखवणारा असून संत तुकाराम महाराजांचे अभंग आजही समाजाला प्रेरणा देतात, असे नमूद करण्यात आले.

मुग्धा कर्णिक यांचे वक्तव्य संत परंपरेचा अवमान करणारे आणि वारकरी भाविकांच्या भावना दुखावणारे असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणीही करण्यात आली आहे. वारकरी संप्रदायाने नेहमी शांतता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला असला तरी संतांचा वारंवार होणारा अवमान सहन केला जाणार नाही, अशी भूमिका व्यक्त करण्यात आली. आगामी वारीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारचे वक्तव्य निंदनीय असल्याचेही भाविकांनी म्हटले आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

---

## आळंदीत डॉ. मुग्धा कर्णिक यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : पुण्यात आयोजित महाराष्ट्र नास्तिक मेळाव्यात डॉ. मुग्धा कर्णिक यांनी संत परंपरा आणि पंढरीतील श्री विठ्ठल, तसेच संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्याबाबत केलेल्या कथित विडंबनात्मक वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना हे वक्तव्य भाविकांच्या भावना दुखावणारे असल्याचे म्हटले आहे.

डॉ. कर्णिक यांनी धर्म, पंथ आणि संस्कृती याबाबत आक्षेपार्ह भाष्य केल्याचा आरोप करत, महाराष्ट्राचे लोकदैवत असलेल्या श्री विठ्ठल आणि वारी परंपरेला कालबाह्य ठरवण्याचा प्रयत्न झाल्याचे तापकीर यांनी नमूद केले. या विधानामुळे वारकरी संप्रदायात तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचेही त्यांनी सांगितले. अभ्यासाअभावी अशा प्रकारची बेताल वक्तव्ये केली जात असून त्यामागे प्रसिद्धी मिळवण्याचा हेतू असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणी शासनाने तात्काळ दखल घेऊन डॉ. कर्णिक यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच, समाजात तणाव निर्माण होऊ नये यासाठी डॉ. कर्णिक यांनी वारकरी संप्रदायाची जाहीर माफी मागावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दिनांक २२ मार्च रोजी पुणे येथे जो महाराष्ट्र नास्तिक मेळावा २०२६ संपन्न झाला, त्यामध्ये डॉ. मुग्धा कर्णिक यांनी त्यांच्या भाषणामध्ये धर्म, पंथ, संस्कृती या संबंधी अक्षेपार्ह वक्तव्ये केली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकाराम महाराज यांचा विडंबनात्मक उल्लेख त्यांनी केल्याने त्यांचा निषेध होत आहे.

---

## आळंदी येथील स्वकुळ साळी ज्ञातिगृहाची कार्यकारिणी बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी** : येथील स्वकुळ साळी ज्ञातिगृह, श्रीक्षेत्र आळंदी विश्वस्त मंडळाची नवीन कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली असून अध्यक्षपदी अमित उगले, तर उपाध्यक्षपदी मनोहर दिवाणे यांची निवड झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल शहारे यांनी अधिकृत घोषणा करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्रे प्रदान केली व त्यांचा सत्कार केला.

नवीन कार्यकारिणीत सचिवपदी देवेन क्षीरसागर (ठाणे), सहसचिवपदी दीपक मारवाडी (पुणे), खजिनदारपदी प्रवीण जुंदरे (अहिल्यानगर) यांची निवड झाली आहे. हिशोब तपासणीसाठी नंदकिशोर ढोकळे (नाशिक) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विश्वस्त म्हणून दिलीप जाळिंद्रे, मंगल अष्टेकर (मुंबई), ॲड. स्वाती लंगोटे (छत्रपती संभाजीनगर), अविनाश साळी (रायगड), अनिल भागवत (खेड-रत्नागिरी), मुकुंद साळी (चिंचवड), विलास सरोदे (छत्रपती संभाजीनगर), महादेव साळी (इचलकरंजी), सुनील पावले (अहिल्यानगर) यांचा समावेश आहे. सल्लागारपदी स्वाती ताटे (बीड), विजय ढोरजे (पुणे), अरुण बारगजे (बीड), ज्ञानेश घोडके (पैठण), सुरेश इंगळे (अहिल्यानगर) यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल विविध संस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, तुषार नेटके, भगवान काटे, ज्येष्ठ नेते नंदकुमार वडगावकर, गोविंद ठाकूर यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात जिव्हेश्वर मंदिरात सामूहिक आरतीने झाली. अनिल शहारे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना पारदर्शकपणे काम करण्याचे आवाहन केले. तसेत अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सर्वांगीण विकासासाठी योजना राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

---

### आमदार बाबाजी काळे यांच्याकडून कौतुक

# राजगुरू महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाला 'ए प्लस' दर्जा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर** : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचे पुन्हा एकदा अधोरेखन झाले असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत राबविण्यात आलेल्या गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासक आराखडा प्रक्रियेत कनिष्ठ विभागाला 'ए प्लस' दर्जा प्राप्त झाला आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित मानपत्र प्रदान सोहळ्यात आमदार बाबाजी काळे यांनी महाविद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीत महाविद्यालयाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सीएसआर निधीतून नवीन इमारत उभारण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी कनिष्ठ विभागाला तब्बल ९८ टक्के गुणांसह मिळालेल्या 'ए प्लस' दर्जाबद्दल समाधान व्यक्त केले. शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अकरावीच्या केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्यासाठी विधानसभेत पाठपुरावा करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाला उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, विजय वाडेकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, तालुक्यातील शाळांच्या विकासासाठी ३५ शाळांसाठी २५ कोटी रुपयांचा निधी मिळाल्याची माहिती आमदार काळे यांनी दिली. तसेच पानंद रस्ते योजनेअंतर्गत आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध होणार असून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध करून देण्याचाही मानस त्यांनी व्यक्त केला.

---

## गॅस टंचाईने आंबेगावच्या पूर्व भागात हॉटेल व्यवसाय ठप्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात गॅस टंचाईचे संकट तीव्र झाल्याने हॉटेल व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. गॅसचा अपुरा पुरवठा आणि वाढलेले दर यामुळे ५० टक्क्यांहून अधिक हॉटेल्सना तात्पुरते बंद ठेवण्याची वेळ आली आहे.

मंचर–पुणे–नाशिक महामार्गासह अवसरी, निरगुडसर, पारगाव परिसरातील मुख्य रस्त्यांलगत असलेली अनेक हॉटेल्स गॅसअभावी बंद पडली आहेत. सध्या गॅस टाकीसाठी पाच ते सात हजार रुपये मोजावे लागत असल्याने व्यवसाय परवडत नसल्याची व्यथा व्यावसायिकांनी मांडली.

हॉटेल मोरया प्युअर व्हेजचे व्यावसायिक राहुल गोरे म्हणाले, "गॅसच्या दरवाढीमुळे आणि टंचाईमुळे हॉटेल चालवणे अशक्य झाले आहे. जादा पैसे देऊनही गॅस मिळत नसल्याने हॉटेल बंद ठेवावे लागत आहे." काही व्यावसायिकांनी पर्याय म्हणून प्रत्येक पदार्थामागे २० ते २५ रुपयांची दरवाढ केली आहे. मात्र, त्यामुळे ग्राहकांची संख्या घटली असून व्यवसायावर दुहेरी परिणाम होत आहे. काही ठिकाणी लाकूड किंवा अन्य इंधनाचा वापर करण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी तो खर्चिक आणि वेळखाऊ ठरत असल्याने तोही पर्याय अपुरा पडत आहे.

## सारांश वृत्त

### निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन

**तिरुवनंतपुरम:** केरळचे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांनी बुधवारी राज्यातील जनतेला विधानसभा निवडणुकीत मुक्तपणे आणि निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले. मतदानाच्या पूर्वसंध्येला जारी केलेल्या संदेशात राज्यपाल म्हणाले की, मतदान हा केवळ लोकशाही हक्कच नाही तर एक कर्तव्यही आहे आणि ते अत्यंत दक्षतेने व जबाबदारीने पार पाडले पाहिजे.

### आंध्र सरकारचा अखंड वीजपुरवठा

**अमरावती** : आंध्र प्रदेशाचे ऊर्जामंत्री गोट्टीपती रवी कुमार यांनी सांगितले की, एनडीए आघाडी सरकार वीज दरात वाढ न करता अखंड वीजपुरवठा करत आहे. राज्यभरातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी आणि सेवा वितरण सुधारण्यासाठी पावले उचलली जात आहेत, असे ते ३० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या आंध्र प्रदेश सेंट्रल पॉवर डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या नवीन कॉर्पोरेट कार्यालयाचे उद्‌घाटन करताना म्हणाले. कमी व्होल्टेजच्या समस्या सोडवण्यासाठी आणि स्थिर वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वीज उपकेंद्रांचे बांधकाम केले जात आहे, असे मंत्री म्हणाले.

### वीज चोरीविरोधात विशेष मोहीम

**चंदीगड** : हरियाणा राज्य अंमलबारी ब्युरोने वीज चोरीविरोधातील कारवाई तीव्र केली असून, अतिरिक्त पोलीस महासंचालकांनी अधिकाऱ्यांना वारंवार गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध एक केंद्रित मोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. येथे एका आढावा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवताना, अतिरिक्त पोलीस महासंचालक (एडीजीपी) नवदीप सिंग विर्क यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सराईत वीज चोरांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यांनी यावर जोर दिला की, वीज चोरी हे केवळ महसुलाचे नुकसान नसून तो एक फौजदारी गुन्हा आहे, असा एक कडक संदेश देणे हा या मोहिमेचा उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले. वीजचोरीच्या घटनांना रोखण्यासाठी हे गरजेचे होते.

## अमेरिका आणि इराण दोघांकडून यश मिळाल्याचा दावा

# युद्धविरामाचा नेमका लाभ कोणाला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** इराण–अमेरिका–इस्रायल संघर्षात जाहीर झालेल्या तात्पुरत्या युद्धबंदीमुळे जागतिक स्तरावर मोठा दिलासा मिळाला असला, तरी प्रत्यक्ष परिस्थिती अजूनही अत्यंत नाजूक आणि अनिश्चित असल्याचे चित्र समोर आले आहे. जवळपास पाच आठवड्यांच्या तणावपूर्ण संघर्षानंतर हा करार झाला असून, दोन्ही बाजूंनी तो आपल्या-आपल्या दृष्टीने "यश" म्हणून मांडण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या युद्धबंदीचा निर्णय अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी इराणवर मोठा लष्करी हल्ला करण्याच्या अंतिम मुदतीच्या अवघ्या काही तास आधी घेतला. पाकिस्तानच्या मध्यस्थीने आणि चीनच्या राजनैतिक दबावामुळे हा करार शक्य झाल्याचे सांगितले जात आहे. या करारानुसार दोन आठवड्यांसाठी लष्करी कारवाया थांबवण्यात आल्या असून पुढील वाटाघाटींसाठी मार्ग मोकळा करण्यात आला आहे.

युद्धबंदीच्या कराराचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याचा निर्णय. ही सामुद्रधुनी जागतिक तेलवाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. संघर्षामुळे येथे मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण झाले होते, ज्याचा परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर झाला. युद्धबंदीनंतर जलवाहतूक पुन्हा सुरू झाल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराला दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तथापि, युद्धबंदी लागू झाल्यानंतरही परिस्थिती पूर्णपणे शांत झालेली नाही. इराणमधील लावान रिफायनरी परिसरात स्फोट झाल्याची माहिती समोर आली असून सिरी बेट येथेही अशाच प्रकारची घटना घडल्याचे वृत्त आहे. या घटनांमुळे युद्धबंदी असूनही तणाव कायम असल्याचे स्पष्ट होत आहे.

अमेरिकेच्या दृष्टीने पाहता, या युद्धबंदीमुळे व्यापक युद्ध टळले असून आंतरराष्ट्रीय दबाव कमी करण्यास मदत झाली आहे. तसेच इराणला चर्चेच्या टेबलावर आणण्यात अमेरिकेला यश आल्याचे मानले जात आहे. मात्र, इराणचा अणुकार्यक्रम किंवा प्रादेशिक प्रभाव यासारखी मूलभूत उद्दिष्टे अद्याप साध्य झालेली नाहीत, ही बाबही तितकीच महत्त्वाची आहे.

इराणने या कराराला आपला धोरणात्मक विजय म्हणून सादर केले आहे. अमेरिकेच्या संभाव्य मोठ्या हल्ल्यापासून बचाव करताना इराणने आपली राजकीय आणि लष्करी स्थिती कायम राखली आहे. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीवरील प्रभाव कायम ठेवण्यात इराणला काही प्रमाणात यश मिळाल्याचे मानले जात आहे. तथापि, युद्धामुळे पायाभूत सुविधा आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला असून निर्बंधांचे संकट अजूनही कायम आहे.

दरम्यान, इस्रायल ने या युद्धबंदीला सहमती दर्शवली असली, तरी हिजबुल्लाह विरोधातील कारवाया सुरूच राहतील, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रादेशिक तणाव पूर्णपणे निवळलेला नाही, हेही स्पष्ट होते. या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना भारताचे परराष्ट्र मंत्रालय यांनी युद्धबंदीचे स्वागत केले असून संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गावर भर दिला आहे. तसेच होर्मुझ सामुद्रधुनीतून जागतिक व्यापार अखंड सुरू राहावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

ही युद्धबंदी ही कायमस्वरूपी शांततेपेक्षा तात्पुरता 'विराम' असल्याचे स्पष्ट होत आहे. दोन्ही बाजूंनी विजयाचा दावा केला असला, तरी कोणालाही निर्णायक यश मिळालेले नाही. पुढील काही दिवसांत होणाऱ्या चर्चांवरच या संघर्षाचे भवितव्य अवलंबून राहणार असून, परिस्थिती पुन्हा चिघळण्याची शक्यता अद्याप कायम आहे.

## प्रियंका गांधी यांच्याकडून निषेध





■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याविरोधात आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी केलेल्या वक्तव्यावरून राजकीय वातावरण तापले असून, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वद्रा यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

प्रियंका गांधी यांनी सरमा यांनी वापरलेली भाषा अस्वीकार्य असल्याचे म्हटले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणात आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली आहे. देशातील कोट्यवधी लोकांचा अपमान होत असताना पंतप्रधान याबाबत काय भूमिका घेतात, हे स्पष्ट झाले पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

हा वाद त्यावेळी उफाळला, जेव्हा खर्गे यांनी आसामच्या मुख्यमंत्र्यांवरील आरोपांची चौकशी केंद्रीय यंत्रणांकडून करण्याची मागणी केली होती. त्यावर प्रत्युत्तर देताना सरमा यांनी खर्गे यांच्यावर टीका करत "म्हातारपणामुळे ते वेड्यासारखे बोलत आहेत," असे वक्तव्य केले. या वक्तव्यामुळे काँग्रेसकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली.

प्रियंका गांधी यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले की, खर्गे हे देशातील ज्येष्ठ नेत्यांपैकी एक असून ते केवळ काँग्रेसचेच नव्हे, तर दलित आणि वंचित समाजांचेही प्रतिनिधित्व करतात. "त्यांचा अपमान म्हणजे देशातील वंचित समाजाचा अपमान आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस पक्षाने सरमा यांच्या वक्तव्याला "दलितविरोधी मानसिकतेचे प्रतीक" ठरवत त्यांच्याकडून बिनशर्त माफीची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे सत्ताधारी भाजप आणि काँग्रेस यांच्यातील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## भाजप-निवडणूक आयोगावर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान मतदार याद्यांमधून मोठ्या प्रमाणात नावे वगळल्याच्या मुद्द्यावरून भाजप आणि भारत निवडणूक आयोग यांच्यावर जोरदार टीका केली आहे. या निर्णयाविरोधात पुन्हा न्यायालयात जाणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील पुनरीक्षण प्रक्रियेनंतर सुमारे ९१ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर बॅनर्जी यांनी प्रतिक्रिया दिली. "नावे वगळून तुम्ही आम्हाला हरवू शकत नाही. या निर्णयाला आम्ही न्यायालयात आव्हान देणार," असे त्या म्हणाल्या. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२५ मधील ७.६६ कोटी मतदारांच्या मूळ यादीतून सुमारे ९०.८३ लाख नावे वगळण्यात आली असून हे प्रमाण ११.८५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या पार्श्वभूमीवर बॅनर्जी यांनी प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "संविधानाने दिलेल्या अधिकारांनुसार मतदारांना यादीत समाविष्ट करण्यासाठी आम्ही कायदेशीर लढा देऊ. लोकांना मतदानाचा हक्कच नाकारला जात असेल, तर ही प्रक्रिया कशासाठी?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हुगळी जिल्ह्यातील आरामबाग येथील सभेत बोलताना त्यांनी भाजपवर मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा आणि मतदारांना आकर्षित करण्यासाठी पैसे देण्याचा आरोप केला. तसेच निवडणूक आयोग भाजपच्या दबावाखाली काम करत असल्याचा गंभीर आरोप करत, "लोकांना फोन करून धमकावले जात आहे," असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, याच मुद्द्यावरून निवडणूक आयोग आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील बैठकही वादळी ठरल्याची माहिती समोर आली आहे. पुढील काळात हा वाद न्यायालयात जाण्याची शक्यता आहे.

## भारतीय नागरिकांना इराण सोडण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिकेमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर जरी तात्पुरता युद्धविराम जाहीर झाला असला, तरी परिस्थिती पूर्णपणे सुरळीत झालेली नाही. त्यामुळेच तेहरानमधील भारतीय दूतावासाने इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना तातडीने देश सोडण्याचा सल्ला दिला आहे.

दूतावासाने स्पष्ट केले आहे की, नागरिकांनी स्वतःहून कोणत्याही सीमेकडे जाण्याचा प्रयत्न करू नये. बाहेर पडताना दूतावासाशी संपर्क साधूनच, त्यांनी सुचवलेल्या मार्गानेच प्रवास करावा. परिस्थिती सतत बदलत असल्याने बेफिकीरपणे हालचाल करणे धोकादायक ठरू शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. मदतीसाठी दूतावासाने आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक आणि ई-मेल आयडीही जाहीर केले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी दिलेल्या अंतिम मुदतीच्या अगदी आधी अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धविरामावर सहमती झाली. या कराराचा भाग म्हणून इराणने होर्मुझ सामुद्रधुनी तात्पुरती खुली करण्यास मान्यता दिली आहे. इस्रायलनेही या युद्धविरामाला पाठिंबा दिला आहे.

या घडामोडीत पाकिस्तानने मध्यस्थाची भूमिका बजावली असून, पंतप्रधान शेहबाज शरिफ यांनी दोन्ही देशांमधील पुढील चर्चा इस्लामाबादमध्ये होणार असल्याचे सांगितले आहे. इराणनेही या युद्धविरामाला सकारात्मक पाऊल मानत चर्चेद्वारे मार्ग काढण्याची तयारी दर्शवली आहे.

मात्र, युद्धविराम असूनही जमिनीवरील परिस्थिती अजूनही तणावपूर्ण आहे. काही भागांमध्ये लष्करी हालचाली सुरूच आहेत, तर सीमावर्ती क्षेत्रे संवेदनशील मानली जात आहेत. त्यामुळे भारतीय नागरिकांनी विलंब न करता सुरक्षित मार्गाने परतावे, हा सध्या सर्वात सुरक्षित पर्याय असल्याचे दूतावासाने स्पष्ट केले आहे.

## राणा अय्यूब यांच्या पोस्ट्सवर न्यायालयाचे ताशेरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने पत्रकार राणा अय्यूब यांच्या काही सोशल मीडिया पोस्ट्सवर तीव्र नाराजी व्यक्त करत त्या "अत्यंत अपमानजनक, चिथावणीखोर आणि जातीयवादी" असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. न्यायालयाने केंद्र सरकार, दिल्ली पोलीस आणि 'एक्स' यांना एकत्रितपणे काम करून संबंधित पोस्ट्स २४ तासांच्या आत हटवण्याचे निर्देश दिले.

न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांनी एका याचिकेवर सुनावणी करताना हे आदेश दिले. संबंधित पोस्ट्समुळे हिंदू देवता आणि ऐतिहासिक व्यक्तींचा अपमान झाल्याचा आरोप याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला आहे. न्यायालयाने नमूद केले की, याच प्रकरणात सक्षम न्यायालयाने यापूर्वीच अय्यूब यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणी केंद्र सरकार, राणा अय्यूब आणि 'एक्स' यांना नोटीस बजावण्यात आली असून दिल्ली पोलिसांनाही पक्षकार करण्यात आले आहे. "या प्रकरणावर सखोल विचार होणे आवश्यक आहे," असे स्पष्ट करत न्यायालयाने तातडीने कारवाईची गरज अधोरेखित केली.

याचिकाकर्त्या अमिता सचदेवा यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, संबंधित पोस्ट्समुळे त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून त्या सतत सार्वजनिकरीत्या उपलब्ध असल्याने मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे. त्यांनी ही सामग्री हटवण्यासाठी 'एक्स'च्या तक्रार निवारण यंत्रणेकडेही दाद मागितली होती.

## भवानीपूर येथून उमेदवारी अर्ज दाखल

# ममता बॅनर्जी यांचे शक्तीप्रदर्शन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बुधवारी भवानीपूर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करताना दमदार शक्तीप्रदर्शन केले. कालीघाट येथील निवासस्थानापासून त्या पायी निघाल्या आणि सुमारे ८०० मीटर अंतरावर असलेल्या अलिपूर सर्वेक्षण इमारतीपर्यंत चालत जात समर्थकांना अभिवादन केले.

या पदयात्रेदरम्यान तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी "ममता बॅनर्जी जिंदाबाद" आणि "टीएमसी जिंदाबाद" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. साध्या पोशाखात, हात जोडून हसतमुखाने अभिवादन करत बॅनर्जी यांनी लोकांशी थेट संवाद साधत निवडणुकीचा माहोल तापवला. भवानीपूर मतदारसंघात तीन वेळा आमदार राहिलेल्या बॅनर्जी यांच्यासमोर भाजपचे सुवेंदू अधिकारी यांचे आव्हान असण्याची शक्यता असून, ही लढत चुरशीची ठरणार असल्याचे संकेत आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बॅनर्जी म्हणाल्या, "माझा जन्म आणि संगोपन भवानीपूरमध्येच झाले आहे. माझे संपूर्ण आयुष्य या मतदारसंघाशी जोडलेले आहे. येथे मिळालेल्या प्रेमासाठी मी जनतेची ऋणी आहे." याचवेळी त्यांनी केवळ भवानीपूरपुरते मर्यादित न राहता राज्यातील सर्व २९४ जागांवर तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले. "आम्ही मोठ्या जनादेशाने विजय मिळवू," असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

भवानीपूर मतदारसंघ सामाजिकदृष्ट्या विविधतेने नटलेला असून बंगाली, गुजराती, मारवाडी, पंजाबी, जैन आणि मुस्लिम समुदायांचे सहअस्तित्व येथे आहे. त्यामुळे या मतदारसंघाला 'मिनी इंडिया' असेही संबोधले जाते.

२०२१ च्या निवडणुकीत बॅनर्जी यांनी येथे मोठा विजय मिळवला होता. मात्र २०२४ लोकसभा निवडणुकीत मताधिक्य घटल्याचे चित्र दिसल्याने यावेळची लढत अधिक रंगतदार होण्याची शक्यता आहे.

## निवडणूक काळात ईडीची कोलकात्यात छापेमारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोलकाता :** मनी लॉँड्रिंग प्रकरणाच्या तपासात ईडीने बुधवारी कोलकात्यात मोठी कारवाई करत मर्लिन ग्रुप आणि त्यांच्या प्रवर्तकांशी संबंधित ठिकाणांवर छापे टाकले.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत ही शोधमोहीम राबवण्यात आली असून, कंपनीचे प्रवर्तक सुशील मोहता आणि साकेत मोहता यांच्याशी संबंधित सुमारे सात ठिकाणांची तपासणी करण्यात आली. या कारवाईवर कंपनीकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. ईडीच्या प्राथमिक तपासात, संबंधित प्रवर्तकांनी बनावट कागदपत्रांचा वापर करून जमिनीच्या मालकीची खोटी साखळी तयार केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या माध्यमातून जमीन बळकावून त्यावर मोठे रिअल इस्टेट प्रकल्प उभारल्याचेही आरोप आहेत. पुढे या प्रकल्पांमध्ये गुंतवणूकदारांना आकर्षित करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार करण्यात आल्याचा दावा तपास यंत्रणेने केला आहे.

तपास यंत्रणेच्या मते, आरोपींनी स्वतःला त्या जमिनीचे कायदेशीर मालक असल्याचे भासवले आणि त्यावर उभारलेल्या प्रकल्पांमध्ये लोकांना मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. या प्रक्रियेत 'बनावट कागदपत्रांचा' वापर हा मुख्य घटक असल्याचे सांगितले जात आहे. ही कारवाई पश्चिम बंगालमध्ये निवडणुकांची धामधूम सुरू असताना झाली आहे. राज्यात २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होणार असल्याने या प्रकरणाकडे राजकीयदृष्ट्याही लक्ष लागले आहे.

## शेअर बाजारात तेजी; सेन्सेक्स वधारला

**मुंबई :** अमेरिका आणि इराणने दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा केल्यानंतर जागतिक बाजारातील प्रभावी तेजी आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील घसरणीच्या पार्श्वभूमीवर, बुधवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये मोठी वाढ दिसून आली. बीएसई सेन्सेक्स २,९८८.८२ अंकांनी वाढून ७७,६०५.४० अंकांवर पोहोचला. एनएसई निफ्टी ८९०.३५ अंकांनी वाढून २४,०१४ अंकांवर पोहोचला. भारतीय बाजारांनी या युद्धविरामाचे तेजीने स्वागत केले.

## अमेरिकेने काय साध्य केले ओमर अब्दुल्ला यांची विचारणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जम्मू :** जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी अमेरिका–इराण संघर्षातील ताज्या युद्धविरामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अमेरिकेने या युद्धातून नेमके काय साध्य केले, असा थेट सवाल उपस्थित केला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात जाहीर झालेल्या तात्पुरत्या युद्धविरामाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर प्रतिक्रिया देताना 'अन्याय्य युद्ध' असा उल्लेख केला. युद्धविरामाच्या करारानंतर सामरिकदृष्ट्या महत्त्वाची होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यात आल्याच्या बातम्यांवर त्यांनी टीका केली.

ओमर अब्दुल्ला म्हणाले की, "ही सामुद्रधुनी युद्ध सुरू होण्यापूर्वीही सर्वांसाठी खुली आणि उपलब्ध होती. मग ३९ दिवस चाललेल्या या युद्धातून अमेरिकेला नेमके काय मिळाले?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, या संघर्षामुळे पश्चिम आशियात मोठा तणाव निर्माण झाला होता आणि जागतिक ऊर्जा बाजारावरही त्याचा परिणाम झाला. अखेर अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात दोन आठवड्यांच्या तात्पुरत्या युद्धविरामावर सहमती झाली. या घडामोडीत अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी इराणविरोधातील आक्रमक भूमिका काहीशी मवाळ करत, पूर्वी केलेल्या कठोर धमक्या मागे घेतल्याचेही समोर आले आहे.

## देशाच्या एकूण पुरवठ्याच्या तुलनेत २६ टक्के हिस्सा

# भारताच्या औपचारिक अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** भारताच्या औपचारिक पतपुरवठा व्यवस्थेत महिलांचा वाढता सहभाग अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण अहवाल समोर आला असून, महिलांचा एकूण कर्ज पोर्टफोलिओ तब्बल ७६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे. हा आकडा देशाच्या एकूण पतपुरवठ्याच्या सुमारे २६ टक्के इतका आहे. निती आयोगाच्या महिला उद्योजकता मंच अंतर्गत तयार करण्यात आलेल्या या अहवालात महिलांच्या आर्थिक सहभागातील लक्षणीय बदल स्पष्टपणे दिसून येतो.

अहवालानुसार, महिला कर्जदार केवळ औपचारिक कर्जप्रणालीत प्रवेश करत नाहीत, तर त्यात सातत्याने प्रगतीही करत आहेत. २०१७ पासून महिलांचा कर्जातील वाटा जवळपास पाचपट वाढला आहे. यामुळे केवळ आर्थिक समावेशनच नव्हे, तर अर्थपूर्ण आर्थिक सहभागाकडे देश वाटचाल करत असल्याचे चित्र समोर येते.

आर्थिक विकासासाठी वित्तीय बाजारांमध्ये सर्वसमावेशक सहभाग आवश्यक आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि औपचारिक कर्जप्रणाली यांचा मेळ घातल्याने महिलांच्या आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणे आणि त्यांना सक्षम करणे सोपे झाले आहे. विशेष म्हणजे, महिला आता लहान कर्जांच्या पलीकडे जाऊन किरकोळ आणि व्यावसायिक कर्जांकडे वळत आहेत.

आकडेवारीनुसार, डिसेंबर २०१७ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत कर्ज-सक्रिय महिलांची संख्या सुमारे ९ टक्के चक्रवाढ वार्षिक दराने वाढली आहे. त्याचवेळी, महिलांमधील कर्ज-व्याप्ती १९ टक्क्यांवरून ३६ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. २०१७ मध्ये महिलांना दिलेले एकूण कर्ज १६ लाख कोटी रुपये होते, ते २०२५ मध्ये वाढून ७६ लाख कोटी रुपये झाले आहे. अहवालात पुढील वाढीची मोठी संधीही अधोरेखित करण्यात आली आहे. देशात सुमारे ४५ कोटी महिला कर्जासाठी पात्र असून, हा वर्ग वित्तीय समावेशनासाठी मोठा आधार ठरू शकतो.

या वाढीमागे व्यावसायिक कर्जपुरवठ्याचा मोठा वाटा आहे. २०२२ ते २०२५ दरम्यान महिला उद्योजकांना दिलेल्या कर्जात वार्षिक ३१ टक्के वाढ झाली, जी एकूण व्यावसायिक कर्जवाढीच्या १७ टक्क्यांपेक्षा लक्षणीय अधिक आहे. याशिवाय, सूक्ष्मवित्त कर्जदारांमध्येही बदल दिसून येत असून, आता पाचपैकी एक महिला वैयक्तिक किंवा व्यावसायिक कर्ज घेत आहे.

सुमारे १६ कोटी महिला कर्जदारांच्या क्रेडिट ब्युरो डेटावर आधारित हा अहवाल असून, ग्रामीण भागातील सूक्ष्म उद्योजकांचाही त्यात समावेश आहे. विशेष म्हणजे, यामध्ये प्रथमच सूक्ष्म-वित्त क्षेत्रातील माहितीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे महिलांचा पतप्रणालीतील सहभाग अधिक व्यापकपणे समोर आला आहे.